सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ११ मे २०११

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०२ /२०११-२०१२

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज यासील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक १९/०५/२०११ रोजी दुपारी ०३.०० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

११/५/११
प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील दि.२८/०३/२०११ विशेष सभा (तहकूब सभा) दि.३१/०३/२०११ रोजीचे व सर्वसाधारण सभा दि.२०/०४/२०११ चे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवट्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या सांगली मिरज रस्त्यावरील जिल्हापरिषद,सांगली समोरील सि.स.नं.६४० अ या जागेत बांधलेल्या दुकान केंद्रामधील तळमजल्यावरील दुकान गाळा नं.१८ क हा भाड्याने देणेकामी जाहिर लिलाव प्रसिद्ध करुन लिलाव करणेत आला होता. सदर लिलावामध्ये ओंकार नामरी सह.पतसंस्था मर्यादित,सांगली यांची सर्वात जास्त अनामत बोली रु.रु.१,८४,०००/- मात्रचे रक्कमेवर वार्षिक भाडे रु.रु.२४,२००/- मात्रवर २१ वर्ष मुदतीने प्रति तीन वर्षाने २०% भाडेवाढ या अटीवर भाड्याने देणेस व लिलावास तीनवार अंतिम मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०७/०५/२०११ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिकेच्या सांगली मिरज रस्त्यावरील जिल्हापरिषद,सांगली समोरील सि.स.नं.६४० अ या जागेत बांधलेल्या दुकान केंद्रामधील तळमजल्यावरील दुकान गाळा नं.१९ ब हा भाड्याने देणेकामी जाहिर लिलाव प्रसिद्ध करुन लिलाव करणेत आला होता. सदर लिलावामध्ये सांगली जिल्हा शासकीय व निमशासकीय कर्मचारी को-ऑप.क्रेडीट सोसा.लि.सांगली यांची सर्वात जास्त अनामत बोली रु.रु.३,३७,५००/- मात्रचे रक्कमेवर वार्षिक भाडे रु.रु.२४,२००/- मात्रवर २१ वर्ष मुदतीने प्रति तीन वर्षानी वार्षिक भाडेवर २०% भाडेवाढ या अटीवर भाड्याने देणेस व लिलावास तीनवार अंतिम मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०७/०५/२०११ चे विषयपत्र.**

... २ ...

६. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्य व वैद्यकिय अधिकारी (वर्ग-३) या पदांना ६व्या वेतन आयोगानुसार र.रु.१३००-३४८०० व ग्रेड वेतन र.रु.४४००/- अशी वेतनश्रेणी दिली जाते. वैद्यकिय अधिकारी यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेबाबत मा.शासनाकडील क्र./सामपा/३००५/३१४४ प्र.क्र.२५७/०५/नवि-२२ दि.२८/०६/२०१० चे पत्र अवलोकनी घेवून निर्णय घेणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२९/०४/२०११ चे विषयपत्र.**

७. महानगरपालिकेच्या क्षेत्रातील स.नं.२५८/१ या जागेवर आरक्षण क्र.१४० हायस्कूल व प्ले ग्राऊंड या आरक्षणाने बाधित आहे. प्रारुप विकास योजनेमध्ये सदरचे आरक्षण पुन्हा ठेवणेत आले आहे. ७/१२ उताऱ्यानुसार ५६९६ व ५६७८.०३ चौ.मी. इतके क्षेत्र महाराष्ट्र शासनाकडे विहित असून, अतिरिक्त क्षेत्र २७८०५.५५ चौ.मी. इतकी असलेची नोंद आहे. सदर जमिनीवरील मधील नागरिकांनी जमिनीवरील आरक्षण वगळून गुंठेवारी प्रस्तावांचे नियमितीकरण करणेकामी लोकशाही दिनामध्ये तक्रारी अर्ज दाखल केला होता. याकामी तसेच, अतिरिक्त क्षेत्राबाबत मा.विभागीय आयुक्त, पुणे यांची मान्यता प्राप्त झालेशिवाय अतिरिक्त क्षेत्राबाबतची अंतिम कार्यवाही करता येत नाही. सबब, सदर आरक्षणामध्ये १०५ भूखंडापैकी ८०% भूखंडामध्ये नागरीकांनी कच्च्या व पक्क्या स्वरुपाची घरे बांधली असून, महानगरपालिकेने सोई-सुविधा पुरविल्या आहेत ही बाब विचारात घेवून, स.नं.२५८/१ या जागेवरील झालेला गुंठेवारी विकास व महासभा ठराव क्र.९२ दि.०९/०८/२००१ अन्वये झालेला निर्णय विचारात घेवून, सदर जागेवरील मंजूर व प्रारुप आराखड्यानुसार आरक्षीत असलेले हायस्कूल व प्ले ग्राऊंडचे आरक्षण उठविणेकामी **गुंठेवारी समिती ठराव क्र.०१ दि.१८/१०/२०१० अन्वये झालेली शिफारस अवलोकनी घेवून निर्णय घेणे. (प्रस्तुतचा विषय दि.२०/१२/२०१० रोजीच्या सभेने प्रलंबित ठेवणेत आला होता.)**

८. सांगली मिरज मंजूर प्रादेशिक योजनेनुसार कुपवाड स.नं.३६१ ही जागा प्रस्तावित रहिवास विभागात समाविष्ठ असून, सदर जागेतून दक्षिणोत्तर १०० फुटी (३०.४८मी.) रुंदीचा नियोजित रस्ता प्रस्तावित आहे. सदर जमिन मालक यांनी रस्त्याने बाधित १३३५ चौ.मी. क्षेत्राची शासकीय दराने बाजारभावाने नुकसान भरपाई मागणी केली आहे. त्यानुसार नुकसान भरपाई पात्र क्षेत्र १६९ चौ.मी.होत असून, १०० फुट नियोजित रस्त्याने बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करणे तसेच, नुकसान भरपाईची र.रु.५,८०,९२३/- मात्र निधी उपलब्धतेनुसार टप्याटप्याने आदा करणेस तसेच, रस्त्याच्या क्षेत्राचे मुल्यांकन मुल्य निर्धारण विभागाकडून निश्चित करुन घेवून अंतिम मुल्यांकनानुसार उर्वरित रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.०५/०५/२०११ चे विषयपत्र.**

९. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१०. मा.महापौर, यांचे संमतीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- २३

विषय क्रमांक :- ०१

मागील दि.२८/०३/२०११ विशेष सभा (तहकूब सभा) दि.३१/०३/२०११ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.२६१ ते ठराव क्र.२६२ आणि सर्वसाधारण सभा दि.२०/०४/२०११ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०१ ते ठराव क्र.२२ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले सदरचे कार्यवृत्त ही सभा सर्वानुमते वाचून कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ३२

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०७/०५/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली येथील सांगली मिरज रस्ता जिल्हा परिषद समोरील सि.स.नं.६४०/अ या जागेत बांधलेल्या तळमजल्यावरील दुकान गाळ्यामधील दुकान गाळा क्र.१८क भाड्याने देणेकामी वार्षिक भाडे र.रु.२४,२००/- व अनामत र.रु.५०,०००/- निश्चित करुन अनामत रक्कमेसाठी जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन लिलाव आयोजित करणेत आला होता. विहित मुदतीत सदर गाळ्यासाठी लिलाव प्रक्रियेमध्ये खालील लिलाव धारकांनी भाग घेतलेला होता.

१) श्री.इसाक आदम जमादार

२) श्री.फारुक कमरुद्दीन शेख

३) श्री.गौरव सुरेश कुलकर्णी

४) ओंकार नागरी सह.पतसंस्था मर्या.सांगली

वरील चार लिलाव धारकांपैकी ओंकार नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित सांगली यांनी दुकानगाळा क्र.१८ च्या अनामत रक्कमेसाठी सर्वात जास्त बोली र.रु.१,८४,०००/- मात्रचे बोलीस अंतीम तीनवार तसेच सदरचा दुकानगाळा लिलाव शर्ती-अटींनुसार व महापालिकेच्या शर्ती-अटीनुसार **२१** वर्षे मुदतीने वार्षिक भाडे र.रु.२४,२००/- यावर दर तीन वर्षांनी एकवेळ आस्तित्वातील भाड्यावर २०% भाडेवाढ करुन भाड्याने देणेस विषयपत्रातील शिफारशींनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Kewzon

अनुमोदक :-

ठराव बहूमताने मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- 33

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०४/०५/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या सांगली शहरातील सांगली मिरज रस्ता जिल्हा परिषद समोरील सि.स.नं.६४०/अ या जागेत बांधलेल्या तळमजल्यावरील दुकान गाळा क्र.१९ ब भाड्याने देणेकामी वार्षिक भाडे र.रु.२४,२००/- व अनामत र.रु.७५,०००/- निश्चित करुन अनामत रक्कमेसाठी जाहिर लिलाव नोटीस प्रसिद्ध करुन लिलाव आयोजित करणेत आला होता. विहित मुदतीत सदर गाळ्यासाठी लिलाव प्रक्रियेमध्ये खालील लिलाव धारकांनी भाग घेतला होता.

१. श्री.योगेश जयंतराव मोरे
२. सांगली जिल्हा शासकीय व निमशासकीय को.ऑप.क्रेडीट सोसायटी लि.सांगली
३. श्री.रफिक सिकंदर महाब्री
४. श्री.अशोक बाळू सरगर

वरील चार लिलाव धारकांपैकी सांगली जिल्हा शासकीय व निमशासकीय कर्मचारी को.ऑफ क्रेडीट सोसायटी लि.सांगली यांनी दुकान गाळा क्र.१९ब च्या अनामत रक्कमेसाठी सर्वात जास्त बोली र.रु.३,३७,५००/- मात्रचे बोलीस अंतीम तीनवार तसेच सदरचा दुकान गाळा लिलाव शर्ती-अटीनुसार व महानगरपालिकेच्या शर्ती-अटीनुसार २९ वर्षे मुदतीने वार्षिक भाडे र.रु.२४,२००/- मात्रचे भाडेवर दर तीन वर्षातून एकवेळ आस्तित्वातील असलेल्या भाड्यावर २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर भाड्याने देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Kewsow

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ३४

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.२९/०४/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वैद्य व वैद्यकीय अधिकारी वर्ग -३ या पदांना ४ थ्या वेतन आयोगानुसार रु.२०००-३५०० अशी वेतनश्रेणी दिली जात होती. सदर पदावरील सेवकांनी मागणी केलेनुसार स्थायी समिती ठराव क्र.२७३ दि.०३/१२/२००३ व महासभा ठराव क्र.१५४ दि.२०/१२/२००३ नुसार वैद्यकीय अधिकारी वर्ग ३ मधील सेवकांना सुधारीत वेतनश्रेणी रु.२२००-४००० लागू करणेस ठराव पारित करणेत आलेला आहे.

महापालिकेच्या आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ व ३ ही पदे समान संवर्गातील केल्यास सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचा दर्जा समान होवून प्रशासकीय सौकार्याच्या दृष्टीने कामाची जबाबदारी सोपविण्यास उपयुक्त ठरेल सबब, महापालिका आस्थापनेवरील वैद्यकीय अधिकारी वर्ग-३ ची पदे वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ करणेस व सदर पदाला सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेस मान्यता मिळणेकामी मा.शासनाच्या नगरविकास विभाग मुंबई यांचेकडे दि.१७/०१/२००४ ने प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

महासभा ठराव क्र.५४ दि.१९/०७/२००६ अन्वये वैद्यकीय अधिकाऱ्यांना व वैद्य यांना समान वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० अशी सुधारीत वेतनश्रेणी लागू करणेस मान्यता देण्यात आली होती. तथापि, मूळ प्रस्ताव दि.१७/०१/२००४ चे कामी नगरविकास विभाग यांनी ६ वा वेतन आयोग लागू करतेवेळी सदर प्रस्तावाचा विचार करावा असे क्र.सामपा/३००५/३१४४/ प्र.क्र.२५७/०७/नवि.२२ दि.०५/०५/२००९ रोजीच्या पत्राने कळविणेत आले आहे.

दरम्यानचे काळात महासभा ठराव क्र.७६ दि.१३/०८/२००९ नुसार महापालिका कर्मचाऱ्यांना ६ वा वेतन आयोग लागू करणेस मान्यता दिली आहे. ६ वा वेतन आयोग मंजूर करताना ५ व्या वेतन आयोगानुसार ज्या वेतनश्रेण्या लागू आहेत. त्या वेतनश्रेणींना समांतर अशीच सुधारीत वेतन संरचना लागू करणेबाबत निर्देश असल्याने, त्यानुसार वैद्यकीय अधिकारी वर्ग-३ यांना ५ वेतन आयोगानुसार दिली गेलेली वेतनश्रेणी रु.६५००-१०५०० या समांतर वेतनश्रेणीस ६ व्या वेतन आयोगानुसार रु.९३००-३४८००व ग्रेडवेतन रु.४४०० ही दि.०१/०९/२००९ पासून लागू करणेत आली आहे.

महाराष्ट्र शासनाचे दि.०५/०५/२००९ चे पत्रावर मा.आयुक्तसो यांचेकडे प्रस्ताव सादर केला असता, ६ व्या वेतन आयोगामुळे आस्थापना खर्चात मोठी वाढ झाल्याने, तसेच नविन नियुक्तीवर निर्बंध लागू आहेत. या सर्व बाबी विचारात घेता वरील विषयांकीत वेतनश्रेणीची मागणी मा.आयुक्तसो यांनी अमान्य केलेली आहे. तथापि, मा.महापौर यांनी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये शासनाकडे पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आलेले दि.०५/०५/२००९ रोजीचे पत्र महासभेच्या अवलोकनार्थ सादर करणेकामी मौखिक आदेश दिले आहेत. त्यानुसार सदरचे पत्र निर्णयार्थ सादर करणेत आले आहे. सदरचे पत्र अवलोकनी घेवून ही सभा पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे. दि.१७/०१/२००४ च्या प्रस्तावाबाबत मा.शासनाकडून आलेले दिनांक ०५/०५/२००९ चे पत्रानुसार तसेच महासभा ठराव क्र.५४ दि.१९/०७/२००६ नुसार वैद्य व वैद्यकीय अधिकारी यांना ५ व्या वेतन आयोगातील मंजूर वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० अशी निश्चित करुन सहाव्या वेतन आयोगात सदर वेतनश्रेणीस समकक्ष वेतनश्रेणी पूर्वलक्षी प्रभावाने सुधारीत करुन महापालिका आस्थापनेवरील वैद्य व वैद्यकीय अधिकारी यांना लागू करणेस ही सभा मान्यता देत आहे. याकामी नियमानुसार योग्यती वैद्यानिक कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

प्रशासन अधि (आस्थापना)
सदरचा ठराव मा. आयुक्तसो यांचे विचारनिलशार्थ कार्यवाही ठेवावी.

सूचक :-

अनुमोदक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

ठराव बहूमताने मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ३५

विषय क्रमांक :- ०७

सोबतचा गुंठेवारी समिती ठराव क्र.०१ दि.१८/१०/२०१० अन्वये झालेली शिफारस या सभेने अवलोकनी घेतली.

महानगरपालिकेच्या क्षेत्रातील स.नं.२५८/१ या जागेवर आरक्षण क्र.१४० हायस्कूल व प्ले ग्राऊंड या आरक्षणाने बाधित आहे. प्रारुप विकास योजनेमध्ये सदरचे आरक्षण पुन्हा ठेवणेत आले आहे. ७/१२ उताऱ्यानुसार ५६९६ व ५६७८.०३ चौ.मी. इतके क्षेत्र महाराष्ट्र शासनाकडे विहित असून, अतिरिक्त क्षेत्र २७८०५.५५ चौ.मी. इतकी असलेची नोंद आहे. सदर जमिनीवरील मधील नागरिकांनी जमिनीवरील आरक्षण वगळून गुंठेवारी प्रस्तावांचे नियमितीकरण करणेकामी लोकशाही दिनामध्ये तक्रारी अर्ज दाखल केला होता. याकामी तसेच, अतिरिक्त क्षेत्राबाबत मा.विभागीय आयुक्त, पूणे यांची मान्यता प्राप्त झालेशिवाय अतिरिक्त क्षेत्राबाबतची अंतिम कार्यवाही करता येत नाही. सबब, सदर आरक्षणामध्ये १०५ भूखंडापैकी ८०% भूखंडामध्ये नागरीकांनी कच्च्या व पक्क्या स्वरुपाची घरे बांधली असून, महानगरपालिकेने सोई-सुविधा पुरविल्या आहेत ही बाब विचारात घेवून, स.नं.२५८/१ या जागेवरील झालेला गुंठेवारी विकास व महासभा ठराव क्र.९२ दि.०९/०८/२००१ अन्वये झालेला निर्णय विचारात घेवून, सदर जागेवरील मंजूर व प्रारुप आराखड्यानुसार आरक्षीत असलेले हायस्कूल व प्ले ग्राऊंडचे आरक्षण उठविणेकामी मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव महासभेच्या विषयपत्रिकेवर ठेवणेत आला होता. सदरचा प्रस्ताव दि.२०/१२/२०१० रोजीच्या महसभेने प्रलंबित ठेवणेत आला होता. तथापि, मा.महापौर यांनी आदेशीत केल्याने प्रस्तुतचा प्रस्ताव दि.१९/०५/२०११ चे महासभेच्या विषयपत्रिकेवर निर्णयासाठी ठेवला असता, सदरचा प्रस्ताव ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- Keerzon

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ३६

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग,मिरज) यांचे दि.०५/०५/२०११ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज मंजूर प्रादेशिक योजना सन १९८५ साली शासनाने मंजूर केली आहे. मंजूर प्रादेशिक योजनेनुसार कुपवाड स.नं.३६१ ही जागा प्रस्तावित रहिवास विभागात समाविष्ठ आहे. सदर जमिनीमधून दक्षिणोत्तर १०० फुट रुंदीचा नियोजित रस्ता प्रस्तावित आहे. तसेच, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने मा.शासनाच्या मान्यतेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३०(१) अन्वये सादर केलेल्या प्रारुप विकास योजनेमध्ये प्रस्तावित रहिवास वापर व दक्षिणोत्तर १०० फुटी नियोजित रस्त्याचे आरक्षण कायम ठेवले आहे.

कुपवाड स.नं.३६१/१ ही जागा श्री.बाळगोंडा कलगोंडा आणि सुरगोंडा पिरगोंडा पाटील यांचे मालकीची असून, सदरची जागा शेती वापरात आहे. सदर जमिनीतून प्रस्तावित असलेला १०० फुटी रस्त्याने ९६९ चौ.मी.इतके क्षेत्र बाधीत होत आहे. सदर क्षेत्राची शासकीय दराने बाजारभावाने नुकसान भरपाई मिळणेची मागणी केली असून, नियोजित १०० फुटी रस्त्याने बाधीत होत असलेल्या क्षेत्राची संमत्तीपत्र वजा कब्जेपट्टी करुन दिलेली आहे. सदरची कब्जेपट्टी चालू बाजारभावाने किंमत येईपर्यत मालकी हक्क अबाधीत ठेवून संमत्तीपत्र दिलेले आहे.

अर्जदार यांनी मागणी केलेप्रमाणे नियोजित १०० फुटी रस्त्याने बाधीत होणाऱ्या ९६९चौ.मी. क्षेत्राची सन २०१० चे बाजारमुल्य तक्त्यानुसार एकूण र.रु.५,८०,९२३/- इतकी होत असून, सदरची नुकसान भरपाईची रक्कम टप्प्या-टप्प्याने आदा करणेस तसेच, सदर जमिनीचे मुल्यांकन शासनाच्या नगरविकास विभागाकडील मुल्य निर्धारण विभागाकडून निश्चित करुन घेवून अंतीम मुल्यांकनानुसार उर्वरित रक्कम आदा करणेस विषपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

नगररचनाकार

अनुमोदक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ३७

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.११/०३/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सहाय्यक कामगार आयुक्त यांनी शासन अधिसूचना उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्र.बीसीए/२००८/प्र.क्र.९०७/कामगार-७ दि.१६/०४/२००८ अन्वये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर वसुली अधिकारी,निर्धारण अधिकारी वअपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणेत आलेबाबत दि.१६/०४/२००८ चे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील उपकर वसुलीसाठी वसुली अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त, निर्धारण अधिकारी मा.उपायुक्त आणि अपीलीय अधिकारी म्हणून मा.आयुक्त यांची नियुक्ती करणेत आली आहे.बांधकाम व इतर कामगारांच्या कल्याणासाठी कल्याणकारी योजना राबविणे करीता महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळास निधी उपलब्ध होणेसाठी केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार बांधकामाच्या एकूण मुल्यानुसार (जमिनीचे मुल्य वगळून) १% उपकर दिनांक ०१ जानेवारी २००८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने राज्यातील इमारत व बांधकाम नियाक्त्याकडून संबंधीत उपकर वसुली अधिकारी यांनी वसुल करणेबाबतची कार्यवाही करावी असे कळविणेत आले असून,शासन परित्रकाची छायांकीत प्रत पाठविली आहे. शासन परिपत्रकानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील दि.०१ जानेवारी २००८ नंतर ज्या बांधकामास परवानगी दिली आहे. (कंप्लीशन सर्टीफिकेट दिलेले आहे) अशा बांधकाम नियोक्त्याकडून बांधकामाच्या प्रकारावरुन शासनाच्या दर तक्त्यातील बांधकाम दरानुसार होणाऱ्या मुल्यांकनावर (जमिनीचे मुल्य वगळून) पूर्व लक्षी प्रभावाने १% उपकर वसुल करणेस व वसुलात आणलेली उपकराची रक्कम इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळ खाते क्र. ००४२२०११०००१५३ बँक ऑफ इंडिया,ताडदेव शाखा मुंबई या खातेवर डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

नगररचनाकार

सूचक :-

अनुमोदक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ३८

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०५/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासनाने गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अंमलात आणले आहेत. सदर अधिनियमाच्या तरतुदी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने लागू करुन घेतल्या आहेत. त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रातील गुंठेवारी भागातील प्रस्ताव दाखल करणेस महानगरपालिकेने एकूण १३ वेळा मुदतवाढ दिली आहे. सदरची मुदत दि.३१/०३/२०११ रोजी संपुष्टात आली आहे.

महानगरपालिकेकडे एकूण २७६०७ इतके प्रस्ताव आज अखेर जमा झाले असून, पैकी १८९७५ इतके प्रस्ताव नियमाधीन करणेत आले आहेत. उर्वरित ५९२ प्रस्ताव ब्ल्यु झोन, बफर झोन, शासन निहित आणि विकास योजनेतील रस्त्याने बाधीत एकूण ३२३१ प्रस्ताव नामंजूर केलेले आहेत. अद्यापही ४८०९ प्रस्ताव नियमाधीन करणेच्या प्रक्रियेत आहेत.

महापालिका क्षेत्रातील विस्तारीत भागातील अनेक प्रस्ताव दाखल होणेच शिल्लक आहेत. गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणेस मुदतवाढ दिलेस अंदाजे १५०० प्रस्ताव दाखल होण्याची शक्यता आहे.त्यामुळे महापालिकेस अंदाजे रु.१कोटी इतका महसूल प्राप्त होण्याची शक्यता आहे. गुंठेवारी प्रस्ताव दाखल न केलेल्या नागरीकांना नोटीसा देणे प्रस्ताव दाखल करणेसाठी प्रोत्साहित करणे, अनाधिकृत बांधकामाचा शोध घेवून नोटीसा बजावणे इत्यादी कार्यवाही करणे आवश्यक असून, यासाठी अजून किमान सहा महिन्याचा कालावधी आवश्यक आहे. तसेच, खालील अटींची पुर्तता करणारे प्रस्तावच दाखल करुन घ्यावेत असहे या सभेचे स्पष्ट मत आहे.

१. ज्या रेखांकनाची मूळ फाईल मंजूर आहे. परंतु त्यामधील आणखी काही प्रस्ताव दाखल होणार आहेत असे प्रस्ताव.
२. सन २००१ पूर्वीचे नोंदणीकृत खरेदीपत्र आहे असे प्रस्ताव
३. ज्या भूखंडामध्ये बांधकामे झाली आहेत अगर ज्या भूखंडावर बांधकामे सुरु आहेत असे प्रस्ताव तसेच, ज्या प्रस्तावाबाबत महापालिकेमार्फत नोटीस देणेत आली आहे अगर देणेत येणार आहे.

वर नमुद केलेप्रमाणे ०१ ते ०३ अटीस आधीन राहून गुंठेवारी नियमितीकरण करणेकामी प्रस्ताव दाखल करणेस अंतीम संधी म्हणून दिनांक ०१ जून २०११ पासून ६ महिने मुदतवाढ देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे. तसेच, गुंठेवारी नियमितीकरणाचे प्रस्ताव दाखल करणेसाठी सदरची मुदतही अंतीम असल्याने, गुंठेवारी प्रस्ताव दाखल करणेकामी नागरिकांच्या माहितीसाठी डिजीटल बोर्डस्, तिन्ही शहरात रिक्षाने अलौन्सींग करणे, जास्तीत जास्त प्रसिद्धी देवून विहित मुदतीत प्रस्ताव दाखल होणेसाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत. त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नगररचनाकार
गुंठेवारी विभाग
मिरज सांगली

सूचक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ३९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (लेखाविभाग) यांचे दि.१२/०५/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस १३ व्या वित्त आयोगाकडून अनुदानाचा दुसरा हप्ता रु.२,०७,२४,६३२/- मात्र प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्र सुतल निर्मल अभियानांतर्गत सांगली मिरज नळपाणी पुरवठा योजनांचे बळकटीकरण करणेकरीता लोक वर्गणी पोटी र.रु.८.९५ कोटी इतका निधी महापालिकेस भरावा लागणार आहे. यासाठी १३ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या अनुदानातून रक्कम खर्च करता येईल. तथापि, शासन निर्णयानुसार १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करावयाची अनुज्ञेय कामांची यादीमध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१. घनकचरा व्यवस्थापन
२. पाणी पुरवठा व स्वच्छता
३. सामाजिक पायाभूत सुविधांचा विकास
४. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राबविण्याच्या सुधारणा विषयक कार्यक्रम
५. महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण जयंती निमित्त उपक्रम
६. इतर अनुज्ञेय कामे

शासन निर्णयातील वरील तरतुदी तसेच, सुजल निर्मल योजनांची निकड विचारात घेवून १३ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या अनुदाना पैकी ५०% रक्कम पाणी पुरवठा विभागाकडे लोकवर्गणीपोटी वर्ग करुन, उर्वरीत रक्कमेपैकी २५% रक्कम घनकचरा व्यवस्थापन व २५% रक्कम जलनिःसारण विभागाकडे वर्ग करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Kearrow

मुख्य लेखापाल

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ४०

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (जकात विभाग) यांचे दि.१२/०५/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

दारिद्र्य रेषेखालील महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तुंचे पूणे विभागीय विक्री व प्रदर्शन दख्खन जत्रा सांगली येथे दि.२४/०२/२०११ ते ०१/०३/२०११ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. सदर प्रदर्शनासाठी सांगली जिल्ह्यातून व पूणे विभागातून महिला बचतगटांनी उत्पादित केलेला माल विक्री व प्रदर्शनासाठी महापालिका क्षेत्रात आयात होणार असल्याने, त्या मालावर जकात आकारली जावू नये असे मा.चेअरमन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद,सांगली यांनी दि.०७/०२/२०११ चे पत्राने कळविणेत आले होते. पत्रासोबत मा.किशोर गायकर विभाग अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे जकात माफी बाबतचे पत्र सादर केले होते.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका जकात नियम १९९९ मधील नियम ८ (दोन) नुसार महानगरपालिकेच्या मते काही विशिष्ठ स्थानिक कारणामुळे (ही कारणे महानगरपालिकेच्या ठरावात नोंद करण्यात येतील.) कायम किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट कालावधीकरता सूट मिळण्यास पात्र असेल अनुसूची १ मधील नोंदी ५,७,५३ व ५४ यात समाविष्ठ असलेला माल वगळून इतर सर्व माल अशा मालाची संख्या कोणत्याही वेळी १० पेक्षा अधिक नसेल अशी तरतुद आहे. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बचतगट प्रदर्शन आयोजित कालावधीमध्ये महिला बचतगटाकडून उत्पादित केलेल्या आवक होणाऱ्या मालावर इतर महानगरपालिकेच्या धोरणानुसार जकातीमध्ये सूट देणेकामी विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

सूचक :-

उपायुक्त

अनुमोदक :-

सहाय्यक आयुक्त

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ४१

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१९/०५/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मोबाईल टार्वसना परवानगी देणेकामी महासभा ठराव क्र.१२७ दि.२०/१०/२०१० अन्वये मान्यता दिली आहे. सदर ठरावातील हार्डशिप प्रिमीयम तरतुदीच्या अनुषंगाने मा.आयुक्तसो यांचे कक्षामध्ये बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीसाठी महापालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवर्स कंपनीचे प्रतिनिधी हजर होते. बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सुधारणा करणेबाबत सूचित केले असून, दि.०७/०१/२०११ चे पत्राने विनंती केली आहे.

१. नुतनीकरण फी रु.५०००/- प्रमाणे प्रतिवर्ष प्रमाणे एकूण रक्कम डिपॉझीट म्हणून भरुन घेणे.

२. विना परवाना टॉवर प्रत्येक टॉवरला रु.१,००,०००/- डिपॉझीट भरुन घेणे.

३. नविन टॉवर अद्याप ज्यांनी कनेक्शन जोडले नाही अशा टॉवर्सना रु.२५,०००/- विकास आकार ५ वर्षाचे नुतनीकरण रु.५०००/- प्रतिवर्ष या प्रमाणे रु.२५,०००/- असे एकूण रु.५०,०००/- मात्र डिपॉझीट म्हणून भरुन घेणे.

महासभेने अंतीम केलेल्या दरानुसार मोबाईल टॉवर धारकांकडून प्रतिसाद न मिळाल्याने, मोबाईल टॉवर धारकांच्या प्रतिनिधींची बैठक आयोजित करणेत आली होती. महासभेने निश्चित केलेल्या दरामध्ये वरील प्रमाणे बदल सुचविणेत आले आहेत. त्यानुसार महासभेने निश्चित केलेल्या दरापेक्षा साधारणपणे १६.३१% कमी रक्कम प्राप्त होणार आहे. तथापि, त्यांनी मागणी केलेप्रमाणे सुधारणा न केल्यास संबंधित मोबाईल कंपन्या मे.न्यायालयात गेल्यास न्यायालयीन वादविवाद निर्माण होवून गुंतागुंत वाढविण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, सदर प्रस्तावमध्ये नमुद असले प्रमाणे वरील ०१ ते ०३ बाबीसाठी डिपॉझीट ऐवजी फी म्हणून रक्कम भरुन घेणेस महासभा ठराव क्र.१२७ दि.२०/१०/२०१० मध्ये बदल करणेस धोरणात्मक मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव दाखल केला आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून, खालील प्रमाणे सुधारीत फी निश्चित करीत आहे.

१. नुतनीकरण फी -५०००/- मात्र प्रतिवर्ष

२. विना परवाना टॉवर प्रत्येक टॉवरला र.रु.१,००,०००/- मात्र फी.

३. नविन टॉवर अद्याप ज्यांनी कनेक्शन जोडले नाही अशा टॉवर्सना रु.२५०००/- विकास आकार, ५ वर्षाची नुतनीकरण रु.५०००/- याप्रमाणे रु.२५,०००/- अशी एकूण र.रु.५०,०००/- मात्र फी.

वरील प्रमाणे ०१ ते ०३ बाबीसाठी मोबाईल टॉवर्स प्रतिनिधी यांनी मागणी केलेनुसार त्यांचेकडून डिपॉझीट ऐवजी फी म्हणून भरुन घेणेस महासभा ठराव क्र.१२७ दि.२०/१०/२०१० मध्ये बदल करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

नगरश्चनाकार

सूचक :-

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०५/२०११

ठराव क्रमांक :- ४२

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (नादानिक) यांचे दि.१८/०५/२०११ चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मा.शासन निर्णय क्र.एमएससी-२००६/प्र.क्र.१७०/०६ प्रशासन-२ मंत्रालय,मुंबई दि.१४ फेब्रुवारी २०११ चे शासन निर्णयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज या संस्थेच्या स.नं.९६४ अ/१ ब मधील १ हेक्टर ७३ आर एवढी जागा केंद्र शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत झोपडपट्टी विकास करण्यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे प्रत्यार्पित करण्यास त्याच प्रमाणे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेले किसान चौक येथील महापालिका दवाखाना अंतर्गत असणारे नागरी आरोग्य केंद्र शासकीय महाविद्यालय,मिरज या संस्थेकडे टप्प्या-टप्प्याने हस्तांतरीत करुन घेण्यास शासन मान्यता झालेली आहे.

त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेला किसान चौक येथील नागरी आरोग्य केंद्र शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज या संस्थेकडे टप्याटप्याने हस्तांतरीत करुन घेण्यासाठी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत धोरणात्मक निर्णय होवून तसा ठराव पारित झालेनंतर अथवा पारित होण्या अगोदर महानगरपालिकेच्या सक्षम जेष्ठ अधिकाऱ्यांकडून अथवा लोकनियुक्त पदाधिकारी यांचेकडून लेखी ग्वाही मिळावी व त्यानंतररि.स.नं.९६४अ/१/ब या जागेचा ताबा शासन निर्णयानुसार मा.जिल्हाधिकारी यांचेकडे प्रत्यार्पित करणेत येईल असे अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज यांनी जा.क्र.शावैममि/नाकेशावैममि/८५३८-४४/२०११ दि.१९/०४/२०११ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

मिरज किसान चौक मनपा दवाखान्याचा नगर भूमापन कार्यालयाकडील मालकी हक्काचे उताऱ्यावरुन जागेचा सि.स.नं.९५४६ असा असून त्यामध्ये ज्या क्षेत्रात मनपाचे नागरी आरोग्य केंद्र आहे. त्या इमारतीचा सि.स.नं.५८६१ आहे.त्याचे क्षेत्र ३२६.८०चौ.मी.इतके आहे. त्या क्षेत्रामध्ये नागरी आरोग्य केंद्राचे क्षेत्र ८५.६३ चौ.मी.इतके आहे. मालकी हक्काचे ठताऱ्यावर लागा मालक म्हणून महाराष्ट्र शासन अशी नोंद आहे व सदर जागा १९८४ साली तत्कालीन मिरज नगरपरिषदेस मा.शासनाकडून भाडेपट्टयाने दिली असलेबाबत विषयपत्रात नमुद आहे.

सबब,मा.अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज यांनी उपरोक्त परिच्छेदामध्ये नमुद केलेनुसार किसान चौक,मिरज येथील नागरी आरोग्य केंद्र ८५.६३चौ.मी.इतके क्षेत्र मा.अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यलाय,मिरज या संस्थेकडे टप्प्या-टप्प्याने हस्तांतरीत करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

नगरअभियंता
(नागरिक)

सूचक :- Keerrow

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.